Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

# DR. KHATRI MAHAVIDYALAYA TUKUM, CHANDRAPUR

## DEPARTMENT OF CULTURAL

**Session-2025-2026**

### *ABOUT THE COMMITTEE*

Cultural committee has been working in arts, commerce and science college since 1997 to enhance artful vision among the students. Department organize various activities, programmes and competition to develop their hidden talent, arts and skill base vision which teach them to survive in the competitive world. Department motivate the students to participate in various activities. It helps the students for self development and decision making person in his own life.

### *OBJECTIVES:*

- Promotion of performing art of various genre (Classical, Folk, Tribal) in the field of music, dance, and drama.
- Promotion of Visual arts (Paintings, Folk arts and Crafts).
- Develop the intellectual Competences of inquiry, analysis, and critical thinking through written and oral communication.
- Demonstrate on understanding of the traditions, histories and values of the other cultures.

### *GOALS:*

01) To engage students in the collaborative process.

02 )To engage critical studies and histories of dance, theatre and performance with rigor and curiosity.

03 )The strengthen students creative skills in live performance through the study of craft and technique.

04 )To create unique, challenging and diversetive performance and share them with our community.

## CULTURAL COMMITTEE

**List of Members**

| | | |
|---|---|---|
| **1)Mr. Santosh A. Kaware** | **-** | **Convener** |
| **2)Mr. Dilip M. Bawane** | **-** | **Member** |
| **3)Dr. P. R. Moharkar** | **-** | **Member** |
| **4)Mr. M.T. Gurnule** | **-** | **Member** |

## *PROGRAMMES*


**Self- Governance Competition was organized on the occasion of Teachers day Celebration on 04 September 2025.**





GPS Ma
Chandrapur, Maharashtra, India
X8p2+23q, Tadoba Rd, Arihant Nagar, Tukum, Chandr
Maharashtra 442401, India
Lat 19.985276° Long 79.300837°
04/09/2025 09:15 AM GMT +05:30








❖ **Two Students of the College Participated in ‘District level Debate Competition’ Chandrapur. On Dated: 14/10/2025. 1)Ku. Astha Ganvir ( B. Sc. I ) 2) Ku. Bhuvneshvari Sahu (B.A. I)**





महाराष्ट्र शासन

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर

संजय गांधी मार्केट भु विकास बँक ईमारत सा.बा. कार्यालयाचे समोर नागपूर रोड, चंद्रपूर.

दुरध्वनी क्र.०७१७२-२५०३८१ ई-मेल-ddrchandrapur@gmail.com.gov.in

जा.क्र.जिउनिचं/सामान्य/वकृत्व स्पर्धा/ २६२७ /२०२५ दिनांक:- २९/०९/२०२५.

परिपत्रक

आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष 2025 चे औचित्य साधून केंद्र/राज्य शासनाच्या सुचनेनुसार वरिष्ठ महाविद्यालयीन युवक/युवतींचा सहकारी चळवळीमध्ये सहभाग वाढावा, सहकारी चळवळीची माहिती व्हावी या उद्देशाने जिल्ह्यातील महाविद्यालयीन युवक/युवतींकरीता महाराष्ट्र राज्यात सहकारी शिक्षण प्रशिक्षण, प्रचार व प्रसिध्दीचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे यांच्या वतीने व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर व चंद्रपूर जिल्हा सहकारी बोर्ड मर्या. चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मंगळवार दि. १४/१०/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता सहकार प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूरचे सभागृह, रेल्वे मालधक्क्याजवळ, जलनगर, चंद्रपूर येथे करण्यात आले असून या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे यांचे वतीने रू. 2000/- (अक्षरी दोन हजार रू. फक्त) व सन्मान चिन्ह व द्वितीय स्पर्धकास रु. 1000/- (अक्षरी एक हजार रू. फक्त) व सन्मान चिन्ह बक्षिस देण्यात येणार आहे. तसेच प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे यांच्या वतीने माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे. स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर नियमाप्रमाणे प्रवास भत्ता अदा करण्यात येणार आहे.

**स्पर्धेचा विषय :- सहकारी चळवळीतून ग्रामीण विकास**

जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे नियम व अटी

1) दिलेल्या विषया व्यतिरीक्त इतर विषयांवर वक्तृत्व करता येणार नाही.
2) वरिष्ठ महाविद्यालयातील युवक/युवती या स्पर्धेसाठी पात्र असतील.
3) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या युवक/युवतींना महाविद्यालयाचे ओळखपत्र सादर करणे अनिवार्य असून स्पर्धेपूर्वी ३० मिनीटे आधी स्पर्धेच्या ठिकाणी हजर राहणे आवश्यक आहे.
4) या स्पर्धेकरिता प्रवेश फी शुल्क प्रती स्पर्धक रू. 100/- निर्धारीत केले असून एका स्पर्धकास केवळ एकदाच प्रवेश शुल्क भरता येईल.
5) स्पर्धेचे माध्यम मराठी किंवा हिंदी राहील.
6) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीस बोलण्याकरिता (७+३)= १० मिनिटे वेळ देण्यात येईल. व परिक्षकाचा निर्णय हा अंतिम असेल.
7) एकदा वक्तृत्व केल्यानंतर पुन्हा संधी देण्यात येणार नाही.
8) सदर स्पर्धेत प्रथम येणाऱ्या युवक/युवतींना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे मार्फत पुणे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत थेट प्रवेश दिला जाईल.


वरिल सर्व नियम व अटीस अधिन राहुन जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पाडण्यात येईल. तरी स्पर्धेत भाग घेणाऱ्या युवक/युवतींनी प्रवेश शुल्काची रक्कम स्पर्धेच्या किमान 02 दिवस अगोदर किंवा स्पर्धेच्या दिवशी संयोजक श्री. एन. डी. [illegible], जिल्हा सहकार विकास अधिकारी, चंद्रपूर जिल्हा सहकारी बोर्ड मर्या. चंद्रपूर यांचेकडे जमा करावी.

संपर्क क्र. :- [illegible]

सहायक निबंधक, (प्रशासन)
सहकारी संस्था, चंद्रपूर.

❖ **Cultural Department Organized Flower Decoration & Rangoli Competition For College Students On Dated 13 Septembar 2025. In thi Competition 25 Students participated in Flower Decoration Competition and 50 Students Participation in Rangoli Competition**.



Dnyandeep Shikshan Prasarak Mandal
DR. KHATRI MAHAVIDYALAYA
Tukum, Chandrapur –442401

PRINCIPAL: Dr. J. M. KAKDE

DKM / CH/ /2025

Date: 30/08/2025

नोटीस

दिनांक 13 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता महाविद्यालयात ...

रांगोळीचे प्रकार:-

स्पर्धेचे नियम:

दिनांक: 30.08.2025

Principal
Dr. Khatri Mahavidyalaya
Tukum Chandrapur



❖ **In the Session 2025-2026 128 Students were Felicitated who got placed in various competition organized by the College and University.**

## Date: 23rd March 2026

**The programme was Chaired by honourable President Dr. N. H. Khatri sir, honorable Senate Member Dr. Sanjay Gore sir (GUG), honourable Secretary Dr. S.B. Kapoor sir, honourable Treasurer Prof. Anushree Parasher Madam, and honourable Principal Dr. J.M. Kakde sir graced the programme with their chief presence**.












देशोन्नती

ॉ.खत्री महाविद्यालयात बक्षीस वितरण सोहळा उत्सा

न्नती वृत्तसंकलन

चंद्रपूर : डॉ. खत्री विद्यालय, तुकूम, येथे दिनांक मार्च रोजी महाविद्यालयाच्या गृहात बक्षीस वितरण सोहळा ाहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. . एच. खत्री होते. तर प्रमुख थी म्हणून प्रा. डॉ. संजय गोरे, एस. बी. कपूर, प्रा. अनुश्री ाशर, प्राचार्य डॉ. जे. एम. कडे आणि प्रा. आर. के. ुरकर इत्यादी मान्यवर ावर उपस्थित होते.

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे वर्षभरात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या दृष्टिकोनातून आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि कौशल्यावर आधारित विविध उपक्रम महाविद्यालयात आयोजित करून विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाने आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात येते. याच उद्देशाने २३ मार्च ला भव्य बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. साधारणतः १५० विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते गौ आले. यामध्ये वर्ग ११ पदव्युत्तर, पीएच. डी. आणि शिक्षका पर्यंतचा होता. याप्रसंगी का अध्यक्ष डॉ. एन. एच. ख विद्यार्थ्यांचे कौतुक कर उज्वल भविष्यासाठी दिल्या.

कार्यक्रमाचे ः सांस्कृतिक विभागाच करण्यात आले. का संचालन आणि संपूर्ण सांस्कृतिक विभाग प्र संतोष कावरे यांनी स्पष्ट मान्यवरांचे आभार डॉ बावणे यांनी मानले. बक्षीस वितरण सो कनिष्ठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसहित इतरही मोठ्या संख्येने उपस्थित

Chandrapur Edition
Mar 25, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
वितरण


डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
बक्षीस वितरण

# NEWS GALLERY

देशोन्नती

## डॉ. खत्री महाविद्यालयात पुष्परचना स्पर्धा व रांगोळी महोत्सव




देशोन्नती वृत्तसंकलन

**चंद्रपूरः** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात पुष्परचना स्पर्धा व रांगोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांचे हस्ते या स्पर्धेचे उदघाटन झाले. परिक्षक म्हणुन छोटुभाई पटेल हायसकूलचे शिक्षक श्री. सुदर्शन बारापात्रे व न्यु इंग्लिश हायस्कूलचे शिक्षक श्री. संजय अंड्रस्कर यांना आमंत्रित करण्यात आलं होतं. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला.

विविध रंगाचा आणि कल्पनांचा मेळ घालुन विद्यार्थ्यांनी आकर्षक रांगोळ्या साकारल्या. सदर दोन्ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागप्रमुख आणि महिला सुरक्षा व सक्षमीकरण समितीच्या प्रमुख प्रा. करूणा खोब्रागडे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस.बी. कपुर, गृह-अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका ज्योत्सना वसाके व प्रिती केने आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रा. उषा नाट व अर्चना नागपूर आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. संतोष कावरे या सर्व प्राध्यापकांनी या उपक्रमाचे आयोजन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळाले आणि सांस्कृतिक मूल्ये जपण्याची संधी उपलब्ध झाली. या स्पर्धेत कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी पुष्परचनेत आणि ५० विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धेत उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेकरिता वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील बऱ्याच प्राध्यापकांचे आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती हे विशे

देशोन्नती

## डॉ.खत्री महाविद्यालयात बक्षीस वितरण सोहळा उत्साहात



देशोन्नती वृत्तसंकलन

**चंद्रपूर** : डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, येथे दिनांक २३ मार्च रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एन. एच. खत्री होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. संजय गोरे, डॉ. एस. बी. कपूर, प्रा. अनुश्री पाराशर, प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे आणि प्रा. आर. के. राजुरकर इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे वर्षभरात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या दृष्टिकोना तून आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि कौशल्यावर आधारित विविध उपक्रम महाविद्यालयात आयोजित करून विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाने आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात येते. याच उद्देशाने २३ मार्च ला भव्य बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. साधारणतः १५० विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यामध्ये वर्ग ११ वी पासून पदव्युत्तर, पीएच. डी. संशोधक आणि शिक्षका पर्यंतचा समावेश होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एन. एच. खत्री यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन आणि संपूर्ण रूपरेषा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष कावरे यांनी स्पष्ट केली, तर मान्यवरांचे आभार डॉ. दिलीप बावणे यांनी मानले. या भव्य बक्षीस वितरण सोहळ्याला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विजेता विद्यार्थ्यांसहित इतरही विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Chandrapur Edition
Mar 25, 2026 Page No. 6

# डा.खत्री महाविद्यालयात बक्षीस वितरण सोहळा संपन्न



चंद्रपूर (का.प्र.)–

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक २३ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. एन. एच. खत्री सर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. संजय गोरे, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, सोबतच संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, संस्थेच्या कोषाध्यक्ष प्रा. अनुश्री पाराशर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे आणि विज्ञान शाखाप्रमुख प्रा. आर. के. राजुरकर इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे वर्षभरात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या दृष्टिकोनातून आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि कौशल्यावर आधारित विविध उपक्रम महाविद्यालयात आयोजित करून विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाने आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात येते. याच उद्देशाने २३ मार्च ला भव्य बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. साधारणत: १५० विद्यार्थ्यांना [illegible]ानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यामध्ये वर्ग ११ वी पासून पदव्युत्तर, पीएच. डी. संशोधक आणि शिक्षकापर्यंतचा समावेश होता. सोबतच महाविद्यालयाच्या स्पंदन वार्षिकांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय डॉ. एन. एच. खत्री सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. संजय गोरे यांनी भव्य बक्षीस वितरण सोहळयाबद्दल महाविद्यालयाची प्रशंसा केली ते म्हणाले की, या महाविद्यालयाने फार अल्प कालावधीत लौकिकता मिळवली. विद्यापीठाने महाविद्यालयाच्या प्रगतीचा विचार करून या महाविद्यालयास म्हणूनच उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देऊन सन्मानित केले. ही आपल्यासाठी आनंदाची आणि भाग्याची गोष्ट आहे. एवढ्या मोठ्या भव्य प्रमाणात बक्षीस वितरण सोहळा पाहून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकामध्ये प्राचार्यांनी कार्यक्रमांचा उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा शिस्तबद्ध व एकसमान व्यक्तिमत्व घडविण्यासाठी या सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन आणि संपूर्ण रूपरेषा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष कावरे यांनी स्पष्ट केली, तर मान्यवरांचे आभार डॉ. दिलीप बावणे यांनी मानले. या भव्य बक्षीस वितरण सोहळ्याला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विजेता विद्यार्थ्यांसहित इतरही विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शिक्षकांचे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थितीसह सहकार्य लाभले.

| | |
|---|---|
| **संतोष ए. कावरे** | **डॉ. जे. एम. काकडे** |
| **समन्वयक ( सांस्कृतिक विभाग )** | **प्राचार्य** |
| डॉ. खत्री महाविद्यालय | डॉ. खत्री महाविद्यालय |
| तुकूम, चंद्रपूर. | तुकूम, चंद्रपूर. |